दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक २६ • Title - Code :- MAHMAR4951 • शुक्रवार दि.१३ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# जनता रोड टॅक्स भरते मग टोल कशाला?

## राज ठाकरेंचा मुख्यमंत्री शिंदे यांना प्रश्न



**मुंबई । प्रतिनिधी**

जनता रोड टॅक्स देते मग टोलचा भार कशाला असा रोखठोक सवाल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केला. राज्यातील टोलचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. राज्यातील विविध ठिकाणच्या टोलच्या मुद्यावरून आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि मनसेच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सह्याद्री अतिथीगृहावर भेट घेतली.टोलची दरवाढ करण्यात आली आहे ती करू नये अशी मागणी करण्यात आली. टोल नाक्यांवर सुविधांचा अभाव का? महिलांसाठी शौचालयं का नाही, असा सवालही त्यांनी केला. रस्त्यांची अवस्थादेखील चांगली नसल्याचा मुद्दाही या बैठकीत राज ठाकरेंनी उपस्थित केला. टोल वसुलीच्या माध्यमातून युती सरकारच्या काळातील उड्डाणपूल आणि रस्ते बांधणीचा खर्च वसूल करण्यात येत आहे. मात्र, आता २०२७ नंतर एमएमआरडीए टोल वसूल करणार असल्याचा मुद्दा राज ठाकरे यांनी उपस्थित केला.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टोल प्रश्नावरुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. ठाणे पासिंग चक ०४ च्या गाड्यांना मुंबईत टोल माफ करायचा विचार सुरु आहे. यासंदर्भात सविस्तर बैठक घेऊन लवकरच निर्णय घेऊ, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरेंना दिल्याची माहिती आहे. मात्र राज ठाकरे यांनी याबाबत अधिक बोलण्यास नकार दिला. मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या चर्चेनंतर उद्या शुक्रवारी १३ तारखेला राज ठाकरेंच्या घरी बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. या बैठकीनंतर अधिक माहिती देऊ, असं राज ठाकरे म्हणाले.'मी तुम्हाला एकच वाक्य सांगणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा झाली. परंतु या चर्चेनंतर त्याच्या निर्णयापर्यंत येणं याच्यासाठी म्हणून उद्या सकाळी ८ वाजता माझ्या घरी बैठक आहे.त्या बैठकीत काय निर्णय होतो याबाबत मी १० वाजता पत्रकार परिषद घेऊन सांगेन. मुख्यमंत्री पूर्ण सकारात्मक आहेत.टोलबाबत कोणत्या गोष्टी होणार, काय निर्णय होणार हे मी उद्या सकाळी सांगेन. पोलिसांच्या घराबाबतही चर्चा झाली', अशी माहिती राज ठाकरे यांनी दिली.

# महाडोळी ते चिकणी रस्त्याची दुरावस्था

## प्रशासन कुंभकर्णी झोपेत



**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील महाडोळी ते चिकणी रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्याने मोटार सायकल ने प्रवास करणे अवघड झाले आहे. लोकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक निवेदन देवून देखील प्रशासनाला जाग आली नाही. या रस्त्याने मोठे मोठे खड्डे पडले आहेत. तात्काळ रस्त्याचे काम सुरू करावे अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) युवासेना सैनिक अभिजित कुडे यांनी केली आहे. यावेळी विजय कुडे, रोशन भोयर, राहुल डोमकावळे, राजू पुसदेकर, गजानन हीवरकर, प्रतीक कुडे, प्रमोद कुडे उपस्थित होते.

# बोरी केंद्रात शिक्षण परिषद व निरोप कार्यक्रम

**अहेरी । प्रतिनिधी**

समुह साधन केंद्र बोरी अंतर्गत शिक्षकांसाठीची तिसरी शिक्षण परिषद व सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांचा निरोप कार्यक्रम जि.प.प्राथमिक शाळा आपापल्ली येथील सभागृहात संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी केंद्र प्रमुख लक्ष्मी कुसराम या होत्या तर प्रमुख उपस्थिती सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी रामचंद्र मुंगमोडे,सेवानिवृत्त शिक्षक त्रिनगरीवार,उच्च श्रेणी मुख्याध्यापक गोपाल खेवले,ममता खरवडे यांची होती.सुरवातीला शिक्षण परिषदेच्या नियोजित तासिका घेण्यात आल्या.त्यात शासनाच्या विविध योजना ,फुलोरा अंतर्गत स्तरनिश्चीकरन व सध्याची शाळांची स्थिती व त्यावरील उपाययोजना तसेच मानसिक आरोग्य स्वास्थ्य अंतर्गत तानतनावाचे व्यवस्थापन व शाळा स्तरावर घ्यायचे कार्यक्रम उपक्रम याविषयावर सुलभक अनिल चांदेकर,शैला गोरेकर व केंद्र प्रमुख लक्ष्मी कुसराम यांनी मार्गदर्शन केले.परिषदेच्या दुसऱ्या सत्रात सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी रामचंद्र मुंगमोळे,शिक्षक त्रिनगीवार व बदलुन गेलेले उच्च श्रेणी



मुख्याध्यापक गोपाल खेवले व शिक्षीका ममता खरवडे याना केंद्रातर्फे शाल श्रीफळ व भेट वस्तु देवुन सपत्नीक सत्कार करण्यात आला.याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी रामचंद्र मुंगमोळे ,गोपाल खेवले व ममता खरवडे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना त्यांनी केलेले कार्य व हे कार्य करण्यासाठी शिक्षकांचे मिळालेले सहकार्य याबाबत आपल्या भावना व्यक्त केल्यात.केंद्रातर्फे शिक्षक प्रकाश दुर्गे व शिक्षक डॉ.आत्माराम तोंडे यांनी आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रम संचालन कु.शैला गोरेकर तर आभार प्रदर्शन कु.सुरेखा मेश्राम यांनी व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वितेसाठी मुख्याध्यापक बद्दीवार,वाघमारे,मंत्रीवार,रवि येमसलवार,राजु आत्राम व केंद्रातील सर्व शिक्षक,मुख्याध्यापक यांचे सहकार्य मिळाले.

# ॲड.चंद्रशेखर चांदेकर यांनी चार वर्षाच्या कर्करोग रुग्णाला मदत करीत वाढदिवस केला साजरा

**राजुरा । प्रतिनिधी**

राजुरा तालुका बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड.चंद्रशेखर चांदेकर यांचा आज (दि.१२) वाढदिवस राजुरा न्यायमंदिरात साजरा करीत असताना गोंडपिपरी येथिल चार वर्षाच्या प्रणय निकोडे बालकाला पोटाचा कर्करोग झाला असून तो नागपूर येथे दवाखान्यात उपचार घेत असून त्यांना मदतीची गरज असल्याची पोस्ट सोशल मीडियावर फिरत असताना राजुरा तालुक्यातील प्रख्यात वकील ड चंद्रशेखर चांदेकर यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत ती पोस्ट वाचून त्या मुलाला आर्थिक मदत करीत वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा केला. यावेळी न्यायमंदिरात उपस्थित राजुरा येथिल पत्रकार श्रीकृष्ण गोरे यांच्याकडे सदर मदत त्यापिढीतापर्यंत पोहचविण्यासाठी सुपूर्त केली. यावेळी राजुरा बार असोसिएशनचे अध्यक्ष ड. राजेश लांजेकर, सचिव ड. रविंद्र टिपले, यांचे उपस्थितीत मदत करण्यात आली . वाढदिवस म्हणजे मित्र, परिवारासाठी मोठी पर्वणी असते. पण समाजात काही असे अपेक्षित असतात की ते जीवन जगत असताना सतत संघर्ष करून एक एक क्षण काढीत आहे. ॲड. . चांदेकर यांच्यासारख्या सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या व्यक्तिमत्वाकडून वाढदिवस साध्या पद्धतीने करीत वाढदिवसाचा



खर्च कर्करोगाने पीडित प्रणय निकोडे य चार वर्षाच्या बाळाला मदत म्हणून न्यायमंदिरात राजुरा येथिल पत्रकार श्रीकृष्ण गोरे यांच्यामाध्यमातून पाठविली आहे. यावेळी राजुरा बार असोसिएशनचे अध्यक्ष ड. राजेश लांजेकर, सचिव ड. रविंद्र टिपले, यांचे उपस्थितीत मदत करीत वाढदिवस साजरा केला.यावेळी राजुरा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश लांजेकर, सचिव ड. रविंद्र टिपले,ॲड. निनाद येरने , ज्येष्ठ विधीज्ञ मुरलीधर देवाळकर, सदानंद लांडे, अरुण धोटे, सुनील वज्जलवार, विजय पुणेकर, राकेश पिंपळकर, प्रविण आस्वले, मंगेश बोबाटे, विशाल उपरे, रुपाली दास, प्रशांत तेलकापल्लीवार मोहन कलेगुरवार, भीमराव दुर्गे, शंतनु देशमुख, यशवंत खोके, वंदना जाधव, पदमा मोहितकर, सामाजिक कार्यकर्ता राकेश बेत्तावार यांची उपस्थिती होती.




## शब्द वेध

### माणूस

माणसाला माणूस म्हणण्याच्या
लायकीचा माणूस मफमुळी
राहिला नाही......
तंत्र ज्ञानामुळे झाली प्रगती जरी,
कधी जाळेल भस्मासूर अवनीला
विश्वास ही तो राहिला नाही !
म्हणेल पुढची पिढी माणसांना
दाखवा मज मूळ माणूस
अजूनही मी तो
पाहिला नाही...!!



सुभाष उसेवार
९०११२६२४३९



# ओबीसी आरक्षण आणि सरकारचे इतिवृत्त

**ओबीसींच्या न्याय्य मागण्यांसाठी चंद्रपुरात झालेल्या आंदोलनाचे इतिवृत्त सरकारतर्फे कधी सार्वजनिक केले जाईल याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. त्यात उशीर होत असल्याने ते केव्हा प्रकाशित होईल आणि त्यात काय लिहिले असेल याची उत्सुकता वाढली आहे . शासनाने लवकर इतिवृत्त प्रकाशित करून ओबीसींना न्याय द्यावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**




मागील महिन्यात चंद्रपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राष्ट्रीय ओबीसी विद्यार्थी महासंघाचे जिल्हा अध्यक्ष रवींद्र टोंगे यांनी अन्नत्याग आंदोलन केले होते. मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करू नये यासह इतर मागण्यांचाही त्यात समावेश होता. जवळजवळ २० दिवस आंदोलन चालल्यानंतर सरकारने या आंदोलनाची दखल घेतली. इतर ओबीसी समाजातील नेत्यांशी चर्चा व विचारविनिमय केल्यानंतर या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन सरकारकडून मिळाले.
आंदोलनकर्ते टोंगे यांच्यासोबत झालेल्या चर्चेचे इतिवृत्त ३ दिवसात जाहीर करणार असे ठरले. सभेचे इतिवृत्त लिहायला वेळच किती लागतो.तास, दोन तास, चार तास, खूप झाले तर एक दिवस पुरेसा आहे.मात्र प्रत्यक्षात बैठक होऊन आज १३-१४ होत आहेत तरी सरकारकडून या बैठकीचे इतिवृत्त जाहीर होत नसल्याने ओबीसी समाजामध्ये अस्वस्थता पसरली आहे. सरकारच्या मनात काही खोट तर नाही ना? सरकार आपल्याशी काही दगाबाजी तर करणार नाही ना? अशा अनेक शंकांचे विंचू मनात थैमान घालत असल्याने अस्वस्थता पसरली आहे.इतिवृत्ताला उशीर होत असल्याने ओबीसी समाजातील नेत्यांना शंकाकुशंका यायला लागल्या आहेत. बैठकीच्या इतिवृत्तासाठी सगळे आतुरतेने प्रतिक्षारत आहेत.
काही दगाफटका झालाच तर ओबीसी संघटना पुन्हा आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याची चर्चा कानावर येत आहे. या आधीही ओबीसी आंदोलनाला नागपूरसह विदर्भात उत्तम प्रतिसाद मिळाला.
ओबीसी समाजाने मोर्चा, आंदोलने आणि निवेदन देऊन आपला प्रतिसाद नोंदवला. ओबीसी समाजाची संख्या भारतात ५२% असल्याचे सांगतात.
३७४२ जातीत विखुरलेल्या या समाजाला २७% आरक्षण म्हणजे खरंतर हा एकप्रकारे अन्यायच आहे. परंतु असे सांगितले जाते की,सुप्रीम कोर्टाच्या एका निकालानुसार देशातील सर्व आरक्षण मिळून ५०% च्या वर जाऊ नये असे ठरविण्यात आल्याने मिळेल त्यावर समाधान मानावे लागत आहे. इतर समाजाप्रमाणे हा समाज पाहिजे संघटित नसल्याने त्यांच्यावर नेहमीच अन्याय होतो. त्यांच्या मागण्या मान्य केल्या जात नाहीत .अनेक न्याय्य मागण्यांकडेही सरकार हेतूपुरस्कृत दुर्लक्ष करत असते ही भावना जनमानसात निर्माण होत आहे.
साधे उदाहरण घेऊया. बिहारच्याप्रमाणेच महाराष्ट्रामध्ये जातीनिहाय सर्वे करण्यात यावा ही ओबीसी समाजाची साधी आणि सोपी मागणी आहे. ज्या देशात गुरे,




जनावरे यांचीही मोजणी केली जाते त्या देशात ओबीसींच्या जनगणनेकडे दुर्लक्ष केले जाते ही चिंताजनक बाब आहे.
ओबीसींना सुवर्णमय भविष्य द्यायचे असेल तर त्यांची जातीनिहाय जनगणना झालीच पाहिजे असे अनेकांना वाटते.जे बिहारला जमले ते महाराष्ट्राला का जमत नाही? या समाजामध्ये प्रचंड नाराजी असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे.
ओबीसींच्या साध्या जातीनिहाय जनगणनेला सरकार तयार नसल्याने सरकारच्या मनात नेमके काय चालू असेल याचा अंदाज बांधता येत नाही.
ओबीसी समाजातील मुला, मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह सुरू करावे या मागण्यांसह अन्य २२ मागण्या आहेत.
ओबीसींच्या सर्व मागण्या मान्य करण्याचे आश्वासन शासनाच्या वतीने देण्यात आले आहे. या मागण्यांवर लवकरच अंमलबजावणी होईल असे वाटत होते. तीन दिवसात या मागण्यांचे इतिवृत्त प्रकाशित करण्याचे आश्वासन सरकारतर्फे देण्यात आले होते.त्यामुळे अनेकांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या.परंतु आतु १४ दिवसांचा कालावधी लोटल्याने सरकारच्या मनात काय चालले आहे? याची चिंता ओबीसी समाजामध्ये वाढली आहे. या सभेचे इतिवृत्त लवकरात लवकर मिळावे यासाठी सर्वांचे प्रयत्न चालले आहे. या दिरंगाईतून ओबीसींच्या तोंडाला पाने पुसली जाणार नाही यासाठी सगळे दक्ष आहे. ओबीसी कल्याणमंत्री अतुल सावे यांनी बैठकीतील इतिवृत्तावर काम सुरू असल्याची माहिती दिली असल्याचे वृत्त आहे. तरीही राज्य सरकार ओबीसी नेत्यांसोबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त जोपर्यंत जाहीर करत नाही तोपर्यंत चिंता असणार आहे.
सरकारवर कुणाचा तरी दबाव असावा अशीही शंका अनेकांना यायला लागली आहे. एकीकडे आरक्षणाची मागणी होत आहे हे खरे असले तरी या आरक्षणाचा फायदा तळागाळातील लोकांना मिळेलच याची खात्री देता येत नसल्याचे काहींना वाटते.कारण आरक्षण हे सरकारी नोकऱ्यांना लागू असते.
खाजगी क्षेत्रात आरक्षणाला वाव नसतो असे जाणकार सांगतात. विद्यमान सरकारने सर्वत्र खाजगीकरणाचा सपाटा लावलेला असताना या आरक्षणाचा फायदा किती जणांना मिळेल? या संदर्भातही साशंकता आहे.आरक्षणाचा फायदा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सरकारने चालविलेले खाजगीकरणाचे सत्र थांबायला पाहिजे अशा मतांची काही मंडळी आहे.
खाजगीकरणांमध्ये लोकहितापेक्षा मालकाचे नफा नुकसान याकडे जास्त लक्ष दिले जाते. तेव्हा तिथे आरक्षण हा मुद्दा गौण असतो. या वाढत्या खाजगीकरणानेही अनेकांच्या मनात धडकी भरली आहे. खाजगीकरणाच्या विरोधात लोकप्रतिनिधी आवाज उचलतील अशी अनेकांना अपेक्षा होती.मात्र ऐनवेळी तेही मूग गिळून शांत बसले असल्याने त्यांच्याही भूमिकेबद्दल साशंकता आहे. असे असले तरी शासनाने ओबीसी संदर्भात न्याय्य भूमिका घ्यावी यासाठी सर्व समाज डोळे लावून बसलेला आहे . बघूया सरकार काय निर्णय घेतय ते.

# शूर आम्ही सरदार अम्हाला काय कुणाची भीती ?

# देव, देश अन धर्मापायी प्राण घेतलं हाती !

शाळकरी मुलापासून ते उतारवयाकडे झुकलेल्या ज्येष्ठापर्यंत सगळ्यांच्या अंगावर रोमांच उठवणारे आवेशपूर्ण असे कवयित्री शांता शेळके यांनी लिहिलेले हे अजरामर शौर्य गीत! फक्त शौर्यगीतच नव्हे तर भक्तीगीत, भावगीत, प्रेमगीत, विरह गीत अशा काव्य जगतातल्या प्रत्येक कोंदणात आपले शब्दमोती अलगद आणि चपखल असे सजवून मराठी साहित्यात कधीही न संपणारा अविस्मरणीय लेखनाचा खजिना सर्व सुजाण वाचकांसाठी कवयित्री शांता शेळके बाई यांनी ठेवला आहे. शांता शेळके यांचे सहजसुंदर आणि तरल असे सर्जन गीत म्हणजे अवघ्या मराठीजनांच्या काळजातले संवेदनशील भाव ! कविता आणि गीत या प्रकारातील अंतरच पुसून टाकणाऱ्या शांताबाईंनी महाराष्ट्रातल्या प्रत्येकाच्या जगण्यातल्या अनेक प्रसंगांमध्ये साथ दिली आहे. यंदाचे वर्ष त्यांच्या जन्मशताब्दीचे. या निमित्ताने या लेखाद्वारे त्यांना वाहिलेली ही शाब्दिक आणि भावनिक आदरांजली!शांता शेळके यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९२२ साली पुणे जिल्ह्यातील इंदापूर गावी झाला. त्या एक प्रतिभासंपन्न मराठी कवयित्री होत्या. याशिवाय त्या एक प्राध्यापिका, संगीतकार, लेखिका, अनुवादक, बाल साहित्य लेखिका, साहित्यिक आणि पत्रकारही होत्या. शांता शेळके यांचे शिक्षण पुण्यात (हुजूरपागा शाळा व स.प. महाविद्यालय येथे) झाले. आचार्य अत्र्यांच्या नवयुग' मध्ये ५ वर्षे उपसंपादक राहिल्यानंतर त्यांनी नागपुरातील हिस्लॉप महाविद्यालय, तसेच मुंबईतील रुईया व महर्षी दयानंद महाविद्यालयांमध्ये मराठीच्या अध्यापिका म्हणून काम केले. अनुवादक, समीक्षा-स्तंभ लेखिका, वृत्तपत्र सहसंपादिका म्हणूनही शांता शेळके यांनी साहित्यात मोलाची भर घातली आहे . शांता शेळके या केंद्रीय फिल्म प्रमाण मंडळाच्या, तसेच राज्य नाटक परिनिरीक्षण मंडळाच्या सदस्य होत्या. शांताबाईंनी डॉ. वसंत अवसरे या टोपण नावाने देखील गीते लिहिली. १९९६ या वर्षी आळंदी येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे मानाचे अध्यक्षपदही बाईंनी भूषवले. शांता शेळकेंनी साहित्यातील किती तरी क्षेत्रं सहज ओलांडली. वाङ्मयाच्या क्षेत्रात त्यांनी स्वत:चं अस्तित्व निर्माण केलं. बालसाहित्याच्या जगातही त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. अनेक नाटके, ध्वनी मुद्रिका, चित्रपटांसाठी त्यांनी विपुल गीतलेखन केले. 'तोच चंद्रमा', 'कळ्यांचे दिवस फुलांच्या राती', 'चित्रगीते' ही त्यांची गीतसंकलने प्रसिद्ध आहेत. शांताबाईंनी हिंदी, इंग्रजी, संस्कृत या भाषांमधील साहित्याचे अत्यंत ओघवत्या शैलीत मराठी भाषांतर केलेले आहे. महाकवी कालिदासाचे 'मेघदूत', 'चौघीजणी' त्यांच्या कवितांबरोबरच त्यांचे गद्यलेखन सुद्धा खूप सुंदर आणि मनाला पकडून ठेवणारे आहे. वाचायला घेतले की सोडवत नाही त्यांची पुस्तके. त्यांचे गुलमोहोर, कावेरी, बासरी, इत्यादी कथासंग्रह तर ओढ, धर्म, अशा कादंब-या प्रसिद्ध आहेत.धूळपाटी नावाचे त्यांचे आत्मचरित्र सुद्धा खूप सुंदर आहे. स्वतःच्या लहानपणाबद्दलच्या त्यातील आठवणी तर आपल्याला हेवा करायला लावतात. तसेच 'पावसाआधीचा पाऊस', 'आनंदाचे झाड', 'वडीलधारी माणसे' हे त्यांचे ललित लेख संग्रह खूपच गाजलेले आहेत. भाषांतर हे शांताबाईंच्या दृष्टीनी फक्त अर्थार्जनाचे साधन नव्हते तर स्वतःच्या भाषाभ्यासातील भर टाकणारेपण होते. त्यातील अत्यंत गाजलेले भाषांतर म्हणजे जपानी हायकुंचे. जपान मधील हा काव्यप्रकार त्यांनी अनुवादित करून मराठी रसिकांच्या पुढे 'पाण्यावरच्या पाकळ्या' नावानी ठेवला आणि तो लोकांना इतका आपला वाटला की लोक आता मराठी हायकू असंच म्हणतात.मराठी, संस्कृत आणि इंग्रजी या तिन्ही भाषांवर शांताबाईंचं प्रभुत्व होतं. वाङ्मयाचे सगळेच प्रकार जरी त्यांनी हाताळले असले तरी गीतकर म्हणून त्या विलक्षण लोकप्रिय झाल्या आणि मराठी माणसांच्या मनापर्यंत पोहोचल्या. एखाद्या गीतातून भावनाट्य चित्रीत करण्याचं शब्दकौशल्य त्यांच्या अनेक गीतांतून आपल्याला जाणवतं. विविध क्षणातील वेगवेगळे तरंग त्यांच्या तरलतेसह टिपणं त्यांना सहज जमायचं. 'असेन मी नसेन मी' , 'वर्ष', 'रूपसी', 'गोंदण', 'अनोळख', 'जन्मजान्हवी' ही त्यांच्या कविता संग्रहांची काही नावे. 'मुक्ता आणि इतर गोष्टी' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. 'स्वप्नतरंग' ही त्यांची पहिली कादंबरी; तर 'शब्दांच्या दुनियेत' हा त्यांचा पहिला ललितलेखसंग्रह. त्यांनी उत्तम अनुवादही केले. मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश सारखी भक्ती गीते लिहिली. शूर आम्ही सरदार आणि मराठी पाऊल पडते पुढे या सारख्या चित्रपट गाण्यांनी अनेकांना स्फुरण दिलंय. वास्तविक शांता शेळके म्हणजे सगळ्या लहान मुलांच्या लाडक्या आजी. नातवंडांसाठी किलबिल किलबिल पक्षी बोलती, विहीणबाई विहीणबाई अश्या अनेक छान छान कविता, बालगीतं लिहिणा-या. सोप्या शब्दात सर्वांना समजेल उमगेल अशी कुठलाही कृत्रिमतेचा शब्दप्रयोग न करता कवितेची उत्तमरित्या बांधणी केली आहे, हे त्यांच्या कवितांचे वैशिष्ट्य आहे. मराठी पाठ्य पुस्तक महामंडळानेही शांता शेळके यांच्या रचना शालेय अभ्यासक्रमात घेताना रचनेची सहजता पाहिली आहे, त्यामुळे खालच्या वर्गापासून ते वरील वर्गापर्यंत रचना शालेय अभ्यासक्रमात टिकून राहिल्या आहेत.ह्या लेखाच्या निमित्ताने , शांताबाईंच्या अशाच काही आठवणीतली कविता, गीतांना आठवणींचा उजाळा देण्याचा एक प्रांजळ प्रयत्न मी इथे करत आहे.

गजानना श्री गणराया, आधी वंदू तुज मोरया !
मंगलमूर्ती श्री गणराया, आधी वंदू तुज मोरया !

गणेशोत्सवात हे गाणं ऐकलं नाही असं सांगणारा माणूस विरळाच! शांताबाईंनी लिहिलेल्या या भक्तीगीताने मराठी माणसाचे खुद्द गणेशासोबतचे नाते दृढ केले आहे असं म्हटलं तर अतिशयोक्ती ठरणार नाही, इतकं हे गाणं गणेशोत्सवाशी **एकरूप झाले आहे. याशिवाय,**

**गणराज रंगी नाचतो, नाचतो**
**पायि घागऱ्या करिती रुणझुण**
नाद स्वर्गि पोचतो !गणराज रंगी नाचतो, नाचतो

नादयुक्त शब्दरचना कशी असावी, प्रत्येक शब्दाला एक अनोखा झंकार कसा असावा, कर्णमधुर अशी गेयता कशी असावी, आणि त्याचबरोबर श्री गणेशाची स्तुतीपर आर्त आळवणी कशी रचावी याचे चपखल उदाहरण म्हणजे हे भक्तीगीत होय! जीवनाविषयी, आयुष्यात येणाऱ्या अनेक कडू गोड आठवणींविषयी काव्यात

**प्रज्ञा पंडित,ठाणे**
**९३२०४४१११६**

आपले विचार मांडताना शांता बाई लिहितात,

'काटा रुते कुणाला, आक्रंदतात कोणी
मज फूल ही रुतावे हा दैवयोग आहे

ही कविता म्हणजे जगण्याचा अर्थ सांगणारी एक कैफियतच आहे. या कवितेत त्या म्हणतात, की, 'कुणाच्याही पायी काटा रुतला तर त्यामुळे साहजिकच त्याचे आक्रंदन असणार आहे, मात्र माझ्या वाट्यास काटे न येता फुले आली. असे असूनही इतरांना जसे काटे रुततात तशी मला फुले रुतली !' हा एक अजब दैवयोग आहे. जगाच्या वाटेस काटे येतात आणि ते काटे पायी रुतल्यावर ओठातून वेदनेचे हुंकार बाहेर पडतात. अशा वेळी ज्यांच्या वाट्यात फुले असतील अशी माणसे जगाच्या नजरेत मोठी भाग्यवानच ठरतात. मात्र प्रत्यक्षात कधी कधी उलटे घडलेले असते, काळजातली वेदना अशा वेळी ओठावर आणता येत नाही. मग पायी रुतलेल्या काट्यापेक्षा खोल जखम काळजाला होऊन जाते, तिचा सलदेखील कुणाला दाखवता येत नाही ! किती कठीण आहे ही अग्निपरीक्षा ! मात्र शांताबाई पुढे लिहितात की, यात दैवाची किंवा अन्य कुणाची काहीही चूक नाही कारण दग्ध वेदनांचा हा शाप चिरंतन असून त्याची आता मी तमा बाळगत नाही.शांताबाईंची अशीच एक आठवणीतील कविता विजनवासात गेलेल्या देवळाचे चित्र आपल्या डोळ्यापुढे उभे करते. गावोगावी अशी चिरे ढासळलेली देखभाल नसलेली देवळे आढळतात त्याचं अगदी यथार्थ वर्णन या कवितेत आहे. देवळाच्या भग्नतेचे दुःख या कवितेतून त्या मांडतात.

**विजनामधले पडके देऊळ**
**ओशट ओला तो गाभारा**
**काळोखातील शिवलिंगावर**
**अभिषेकाची अखंड धारा**
'ओलेत्या पानात, सोनिया उन्हात भरुन मेघ आले
डहाळी जणू नवी नवरी हळद रंग ओले
साद ओली पाखराची, ओढ जागे पावसाची
डोहाळे या मातीला, सूर बोले थेंबातला
वाटा आता कस्तुरी, गंध उमले कोंबातला

या अशाच अवीट गोडीच्या कवितेत फक्त शब्दमाधुर्यच नाही तर नादमाधुर्य ही आहे. निसर्गकविता कशी असावी याचे हे आदर्श उदाहरण म्हणायला हरकत नाही.
शब्दांविषयी आपले विचार मांडताना त्या म्हणतात,

'तसे तर शब्द जिवाभावाचे सखेसोबती
श्वासोच्छ्वासाइतके मला निकटचे क्षणोक्षणी
शब्दांच्या आधारानेच सोसत आले आजवर
प्रत्येक आनंद, आघात, आयुष्यातली अधिक उणी
अजूनही जेव्हा मन भरुन येते अनिवार
करावे वाटते स्वत:ला शब्दांपाशी मोकळे
वाटते, त्यांनाच जावे सर्वस्वाने शरण
तेच जाणून घेतील आतले उत्कट उमाळे

शब्दाचे प्रयोजन आणि शब्दांचे महत्व एका कवितेच्या माध्यमातून इतक्या उत्कटतेने व्यक्त खचितच कोणी केले असेल.लुकलुकणाऱ्या चांदणीचं मोहक वर्णन करताना, शब्दबंबाळ न होता नेमक्या शब्दांत त्यांनी चांदण्यांचे सौंदर्य व्यक्त **केले आहे.त्या म्हणतात.**

**'सायंकाळी क्षितिजावरती**
**मंदपणे मी करते लुकलुक**
**शांत राहुनी अपुल्या जागी**
**भवतालाचे बघते कौतुक !**

शांता बाईंच्या कवितांचा उल्लेख होताना 'ऋतू हिरवा' या आठवण तर व्हायलाच हवी.

'ऋतु हिरवा ऋतु बरवा, पाचूचा वनि रुजवा
युग विरही हृदयांवर सरसरतो मधु शिरवा

या कवितेत ऋतूंचे इंद्रधनुष्यी रंगातले चित्र त्या आपल्या शब्द रचनेतून मांडताना त्या भिजुनी उन्हे चमचमती, मधुगंधी तरल हवा, मनभावन हा श्रावण, मदनाचे चाप अशी शब्दसंगती यांनी साधली आहे. स्वप्ने सर्वांनाच साद घालत असतात मात्र स्वप्नांची वाट नेहमीच अगम्य असते. आपल्याला हव्या असणाऱ्या स्वप्नांच्या वाटेने गेल्यावर आपले इप्सित साध्य होईल का याबद्दल हा प्रश्न सर्वांनाच असतो. शांताबाईही जिथे आपली ध्येयपूर्ती होईल अशा स्वप्नसृष्टीचे बहारदार वर्णन आपल्या कवितेत करतात.

**'ही वाट दूर जाते, स्वप्नामधील गावा**
**माझ्या मनातला का तेथे असेल रावा ?**
**जेथे मिळे धरेला आभाळ वाकलेले**
**अस्ताचलास जेथे रविबिंब टेकलेले**
**जेथे खुळ्या ढगांनी रंगीन साज ल्यावा**
**घे साउली उन्हाला कवळून बाहुपाशी**
**लागुन ओढ वेडी खग येति कोटरासी**
**एक एक चांदणीने नभदीप पाजळावा**
**स्वप्नामधील गावा स्वप्नामधून जावे**
**स्वप्नातल्या प्रियाला मनमुक्त गीत गावे**
**स्वप्नातल्या सुखाचा स्वप्नीच वेध घ्यावा...'**

'सुकुनी गेला बाग' या कवितेत शांताबाईनी केलेले शब्दचित्रण अतुलनीय आहे. नेटक्या विशेषणांचा सुयोग्य वापर या कवितेत त्यांनी केला आहे.

पाचोळ्यातच पाऊल बुडले जुन्या हरवल्या
पाउलवाटा, कसा काढणे माग ? त्या तरुखाली
एकामेकां दिल्याघेतल्या आणाभाका पानांसंगे
आशा जाळीत ये ग्रीष्माची आग पालवीतली
विटली नक्षी झाडांवरती मुकेच पक्षी गीत
गळ्यातच गुदमरले त्या पुन्हा न येई जाग

शांताबाईंची कोळीगीतेही कथाप्रवण आहेत.

**माज्या सारंगा, राजा सारंगा**
**डोलकरा रं धाकल्या दीरा रं**
**चल जावया घरा !**
**आज पुनवा सुटलंय दमानं**
**दरियाच्या पान्याला आयलंय उदान**
**पिऊन तुफानवारा**
**शीड फाटलं धावतं पाठी**
**तुटलंय सुकानू मोरली काठी**
**फेसाल पान्याचा घेरा**
**कोलीवारा रं राहीला दूर**
**डोलां लोटीला पान्याचा पूर**
**संबाल संसार सारा**

हे कोळीगीत अर्थपूर्ण तर आहेच पण त्याच बरोबर ते श्रवणीयही झाले आहे.
शृंगाररसाचा अतिरेक न करता देखण्या ढंगाची लावणी कशी लिहावी याचं उत्तम उदाहरण म्हणून शांताबाईंच्या लावणीकडे निर्देश करता येईल. आपल्या साडीचं मनमोहक वर्णन करतानाच आपल्या प्रितमास साडीला हात लावू नको असं लाडे लाडेचं सांगणं अगदी मधाळ **शैलीत त्यांनी मांडलंय.**
**हे लोकप्रिय गीत म्हणजे :**

**रेशमाच्या रेघांनी, लाल काळ्या धाग्यांनी**
**कर्नाटकी कशिदा मी काढीला**
**हात नगा लावू माझ्या साडीला !**

शांताबाईंचे एक बडबडगीत आजच्या पिढीलाही माहित व्हावे या हेतूने त्याचाही उल्लेख या लेखात आवर्जून करावासा वाटतो. ते गीत म्हणजे,

**विहीणबाई विहिणबाई उठा आता उठा**
**भातुकलीचा सार्याई तुम्ही केला चट्टामट्टा !**
**पसाभर शेंगदाणे, पसाभर गूळ**
**एकटीनं फस्त केलं लागलं का खूळ ?**
**खादाडखाऊ विहीण म्हणून सारी करती थट्टा !**
**कुठुन मेलं बाहुलीचं लग्न काढलं आम्ही ?**
**विहीण म्हणून नशिबी आलात हो तुम्ही !**
**बाळी आमची नाजुक तुमचा बाळ्या केवढा मोठा !**
**सोन्यासारखी लेक दिली आणि फसलो**
**भिकार्यांखशी नातं जोडुन बसलो !**
**वरमाईचा पोकळ नुसता पाहून घ्यावा ताठा !**

बडबडगीताच्या चालीवर आधारित भातुकलीच्या विवाहप्रसंगातलं लोकगीतही शांताबाईंनी मोठ्या तन्मयतेने लिहिले आहे. या गाण्याला गाताना आजही बालपणातला आनंद अनुभवता येतो.प्रचंड लोकप्रियता मिळालेले त्यांचे असेच अजून एक गीत म्हणजे, 'हा खेळ सावल्यांचा' या चित्रपटातील, लयबद्ध **गोडी असलेले कोळीगीत!**

**वल्हव रे नाखवा हो वल्हव रे रामा**
**मी डोलकर डोलकर, डोलकर दर्याचा राजा**

पैठणी हा फक्त एक भारतीय पोशाख प्रकारच नाही तर महावस्त्र असा मान मिळालेले नाजूक स्त्रीमनाचे एक भावविश्व! या पैठणीवरचीच एक अजरामर कविता प्रत्येकाला आवडेल अशीच आहे. या कवितेत आपल्या आजीचीही आठवण त्या लिहितात : फडताळात एक गाठोडे आहे त्याच्या तळाशी अगदी खाली जिथे आहेत जुने कपडे कुंच्या टोपडी शेले शाली त्यातच आहे घडी करुन जपून ठेवलेली एक पैठणी नारळी पदर जरी चौकडी लयबद्ध शब्द आणि मनाला भिडणारा आशय याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून 'पैठणी' या कवितेकडे पाहता येईल.अशी विविध रसातील, काव्य प्रकारातील अनेकविध गाणी लिहिलेल्या शांता शेळके ह्या एकच आहेत का असा प्रश्न पडावा इतक्या त्या आपल्या काव्यलेखनाशी तादात्म्य पावल्या आहेत. शांता शेळके यांना त्यांच्या लेखनक्षेत्रातील अतुलनीय कामगिरी बद्दल अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. त्यातील काही उल्लेखनीय पुरस्कार म्हणजे गदिमा गीतलेखन पुरस्कार (१९९६), सुरसिंगार पुरस्कार ('मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश' या गीतासाठी), केंद्र सरकारचा उत्कृष्ट चित्रगीत पुरस्कार (चित्रपट भुजंग), यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कार (२००१) इत्यादी! याशिवाय शांताबाईंच्या नावानेही साहित्यक्षेत्रातील योगदानाबद्दल 'शांता शेळके साहित्य गौरव पुरस्कार' देऊन माननीय लेखक कवी, कवयित्रींना गौरवण्यात येते. शांता शेळके बाई, यांच्या अजरामर अशा काही गीतांचा आढावा हा आजच्या नवीन वाचक पिढीलाही नक्कीच आपलासा वाटेल यात शंकाच नाही. शांता शेळके यांचा १२ ऑक्टोबर या दिवशी त्यांच्या जयंती निमित्त निमित्ताने आजचा त्यांच्या विषयी शब्दांजली लेख. त्यांच्या अजरामर लेखनाने त्या कायम आपल्या स्मृतीत राहतील. सरते शेवटी, त्यांच्याच एका कवितेने या लेखाचा समारोप करणे उचित ठरेल.

**'असेन मी, नसेन मी, तरी असेल गीत हे**
**फुलाफुलांत येथल्या उद्या हसेल गीत हे..'**

असं तृणात लवलवणारं, अश्रूतून ओघळणारं, फुलात हसणारं त्यांचं हे गीत भावभावनांची विविधता व्यक्त करतं. खरं म्हणजे शांता शेळकेंच्या अंतर्मनात दडून बसलेलं स्त्रीत्व असं स्वाभाविकपणे आणि सूक्ष्मपणे अनेक कवितांतून शब्दाशब्दांतून प्रकट होतं. त्यांना त्रिवार वंदन!

# खवासपुर येथे अनेकांचा शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश

**सांगोला । प्रतिनिधी**

खवासपुर येथील आप्पा जरे वस्ती वरील शिवसेना शिंदे गटाच्या अनेक कार्यकर्त्यांनी पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत शेतकरी कामगार पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला...

स्व गणपतरावजी देशमुख यांचे विचार हे सध्य स्थितीत किती महत्त्वाचे आहेत त्यांची प्रचिती रोजच्या रोज येत असल्याची भावना प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी बोलुन दाखवली.आंम्ही डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांचे कार्य रोज अनुभव आहोत त्यामुळे येणाऱ्या काळात आमच्या समस्या सोडविण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष सक्षम असल्याची भावना आमच्या मनात रुजल्या मुळे आज आंम्ही शेतकरी कामगार पक्षाचा लालबावटा हातामध्ये घेत असल्याचे अनेक युवकांनी बोलुन दाखवले... आप्पा जरे वस्ती वरील सर्व लोकांनी एकत्रित येऊन आंम्ही शेकापक्षामध्ये काम करण्याचा निर्णय घेतला असल्याचेही सांगण्यात आले .. श्री.नरेंद्र संभाजी जरे, श्री.शहाजी संभाजी जरे, श्री.अशोक संभाजी जरे, श्री.अभिमंन्यु संभाजी जरे, श्री.अतुल दत्तात्रय जरे, श्री.ब्रम्हदेव प्रल्हाद जरे, श्री मधुकर आत्माराम जरे, श्री.वामन भिमराव जरे, श्री.दुर्योधन निवृत्ती भोसले,अतुल भोसले,नितीन बागल,नवनाथ



दत्तु भोसले,रमेश कुंभार इत्यादींनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला या कार्यकर्त्यांना शेतकरी कामगार पक्षांची विचारधारा समजावून सांगुन व आप्पा जरे वस्तीचा व गावचा विकास फक्त शेतकरी कामगार पक्षच करु शकतो असे श्री नागनाथ जरे व अंकुश यादव यांनी समजावून व पटवुन सांगुन या कार्यकर्त्यांना शेतकरी कामगार पक्षाच्या झेंड्याखाली आणुन.वरील सर्वांचा जाहीर रित्या शेकापक्षामध्ये प्रवेश झाला..पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ भाई बाबासाहेब देशमुख मार्गदर्शन करताना म्हणाले की..आपली कोणतीही समस्या,अडचण आसुद्यात मी ती सोडवण्यासाठी कटिबद्ध आहे.आपण ज्या काही अनेक दिवसांपासुन प्रलंबीत असलेल्या समस्यांचा पाढा वाचलात त्या समस्या सोडवण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष कटिबद्ध आहे.आज खऱ्या अर्थाने स्व जरे तात्यांची आठवण येते आहे..जरे तात्यांची उणीव कोणीच भरुन क घेणार नाही तरीही तुंम्ही सर्व जेष्ठ व तरुण कार्यकर्त्यांनी एकदिलाने राहुन आपल्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशिल राहिल्यास शेतकरी कामगार पक्ष खंबीरपणे आपल्या पाठीशी राहील.येणाऱ्या काळात ज्यांनी ज्यांनी शेतकरी कामगार पक्षांमध्ये प्रवेश केला आहे त्या सर्वांना विश्वासात घेऊन सर्व निर्णय घेतले जातील.तसेच या सर्व कार्यकर्त्यांना शेतकरी कामगार पक्षांमध्ये सन्मानाची वागणुक दिली जाईल असा विश्वास डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांनी प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना दिला... सदर कार्यक्रमास पुरोगामी युवक संघटनेचे तालुकाध्यक्ष भाई.दिपक गोडसे, डॉ विजयकुमार गायकवाड,माजी पं.स.सदस्य भारत भोसले,मा.चेअरमन माणिक जरे,उपसरपंच नंदकुमार यादव,मा.सरपंच हरिदास फुले, ग्रा.पं.सदस्य नितीन जरे,नागनाथ जरे, आप्पासाहेब जरे,शहाजीराव बलवंत,गणेश दिक्षीत,भारत जरे,नामदेव यादव ,पोपट जरे , नानासाहेब जरे, प्रविण जरे, निलेश भोसले, नानासाहेब भोसले,विलास जरे साहेब,सदाशिव ढेरे, आण्यासाहेब ढेरे,मधुकर ढेरे,अजित ऐंवळे, विष्णू यादव, अंकुश यादव,दिलीप जरे, विष्णू जरे, बाळासाहेब जरे,अजित जरे,आनंदा भोसले, संभाजी भोसले, श्रीनाथ जरे,बापुराव यादव,दिलीप भोसले,गणेश बोडरे,नेताजी भोसले,धनाजी बोडरे,वैभव ढेरे, आण्णासाहेब भोसले,नामदेव गायकवाड,संजय भोसले, रामचंद्र भोसले,तानाजी जरे, दादासाहेब भोसले, तात्यासाहेब पाटील, उध्दव ढेरे,नितीन फुले,गुलाब बागल,यओगूश बलवंत,निरंजन ऐंवळे,मारुती बोडरे, विजय बोडरे, श्रीरंग जरे,अनिल जरे,सागर भोसले,अनिल भोसले, चंद्रकांत भोसले, अरविंद यादव,अक्षय यादव, सोमनाथ भोसले,महादेव जरे, संतोष जरे,संजय जरे, गणेश जरे, रणजीत जरे यांच्या सहित अनेक कार्यकर्ते उपस्थित असलेल्याची माहिती शेतकरी कामगार पक्षाचे प्रसिध्दी प्रमुख भाई चंद्रकांत सरतापे यांनी दिली

# खवासपुर गावातील अनेक कार्यकर्त्यांचा शेतकरी कामगार पक्षात प्रवेश

## विकास आणि दर्जेदार कामांसाठी शेतकरी कामगार पक्षाच्या विचाराची ग्रामपंचायत आणण्याचा एकमुखी निर्धार





**सांगोला । प्रतिनिधी**

खवासपुर येथे ग्रामपंचायत निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे गटातील अनेक कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला गेली सहा वर्षे गावातील खुंटलेला विकास रस्ते गटारी आणि शाळा बांधकामांची झालेली निकृष्ट दर्जाची कामे व योजना असुन सुद्धा ग्रामस्थांना पाण्यासाठी करावी लागणारी वणवण यामुळे शिंदे गटातील अनेक कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे नेते पुरोगामी युवक संघटना प्रदेशाध्यक्ष
डॉ बाबासाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला सोबत पुरोगामी युवक संघटना तालुका अध्यक्ष दीपक गोडसे यावेळी डॉ विजयकुमार गायकवाड,मा.पंचायत समिती सदस्य भारत भोसले,माजी चेअरमन माणिक जरे, उपसरपंच नंदकुमार यादव,या.सरपंच हरिदास फुले, ग्रामपंचायत सदस्य नितीन जरे, नागनाथ जरे, आप्पासाहेब जरे,शहाजीराव बलवंत, गणेश दिक्षीत,भारत जरे, नामदेव यादव,पोपट जरे, नानासाहेब जरे,प्रविण जरे,निलेश भोसले, नानासाहेब भोसले, विलास जरे साहेब ,सदाशिव ढेरे, आण्णासाहेब ढेरे, मधुकर ढेरे, अजित ऐवळे, विष्णू यादव, अंकुश यादव, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष दिलीप जरे, विष्णू जरे,बाळासाहेब जरे, अजित जरे,आनंदा भोसले,संभाजी भोसले, श्रीनाथ जरे, बापुराव यादव,दिलीप भोसले,गणेश बोडरे, नेताजी भोसले, धनाजी बोडरे,वैभव ढेरे, आण्णासाहेब भोसले, नामदेव गायकवाड, संजय भोसले, रामचंद्र भोसले, तानाजी जरे,दादासाहेब भोसले,तात्यासाहेब पाटील,उध्दव ढेरे, नितीन फुले, गुलाब बागल, योगेश बलवंत, निरंजन ऐवळे, मारुती बोडरे,विजय बोडरे, श्रीरंग जरे, अनिल जरे,सागर भोसले, अनिल भोसले, चंद्रकांत भोसले, अरविंद यादव,अक्षय यादव, सोमनाथ भोसले,महादेव जरे, संतोष जरे,संजर जरे,रणजित जरे,संजय जरे, गणेश जरे, यांच्या सह शेकडो कार्यकर्ते ग्रामस्थ उपस्थित होते यावेळी शेतकरी कामगार पक्षात शिंदे गटातुन धडाडीचे नेते नरेंद्रबापु जरे, शहाजी जरे, अशोक जरे, अभिमान जरे,मेजर अतुल जरे, अध्यक्ष दुर्योधन भोसले, ब्रम्हदेव जरे, मधुकर जरे सर,अतुल भोसले, नितीन बागल, शिवाजी जरे, रमेश कुंभार, वामनराव जरे, नवनाथ भोसले,ई कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला यावेळी विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले यामध्ये गेले पाच सहा वर्षांत गावचा खुंटलेला विकास आणि निकृष्ट दर्जाची झालेली कामे होणारा मोठा भ्रष्टाचार यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाखाली गावात पिण्याच्या पाण्यासाठी केलेल्या कामाची व इतर सर्व ग्रामविकासाच्या कामाला चालना देण्यासाठी ग्रामपंचायत निवडणूक जिंकण्याचा निर्धार सर्व नवीन जुन्या कार्यकर्त्यांनी केला.

# राज्यातील भाजपाप्रणित सरकार गुजरातच्या आऊट सोर्सिंगवर चालते–नाना पटोले

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील भाजपाप्रणित सरकारने तरुणांच्या सरकारी नोकरीच्या स्वप्नावर पाणी फेरले असून कंत्राटी पद्धतीने पोलिस भरती सुरु करुन आरक्षणावरही घाव घातला आहे. सरकारचा हा निर्णय अत्यंत घातक व सुरक्षेच्यादृष्टीने गंभीर आहे. राज्यातील भाजपाप्रणित सरकार गुजरातच्या आऊट सोर्सिंगवर चालत आहे पण पोलिस भरती कंत्राटी पद्धतीने करुन तरुणांसोबतच महाराष्ट्राच्या सुरक्षेचा खेळखंडोबा करु नका, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.नाना पटोले यांनी सरकारचा खरपूस समाचार घेतला. मुंबई पोलिस दलात तीन हजार पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याचा जीआर सरकारने काढला आहे. पोलिस दलासारख्या सुरक्षेसाठी महत्वाच्या असलेल्या खात्यात कंत्राटी पद्धतीने भरती करणे हे अत्यंत चुकीचे



आहे. पोलिस दल, तहसीलदार अशी महत्वाचे पदे ओऊटसोर्सिंगने भरून सरकार चुकीचा पायंडा पाडत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने महाराष्ट्राचा देशात नावलौकिक आहे, कंत्राटी पोलिस भरती करुन भाजपा सरकार महाराष्ट्राच्या सुरक्षेचे तीन तेरा वाजवत आहे. कंत्राटी पद्धतीने पोलिस भरती करून राज्यातील येड्याचे सरकार महाराष्ट्राला काळिमा फासण्याचे काम करत आहे, हे काँग्रेस कदापी खपवून घेणार नाही, असे ते म्हणाले.नाना पटोले म्हणाले की, भाजपने निवडणुका जिंकण्यासाठी जी काटेरी बीजे पेरली होती ती आता बाहेर निघत आहेत. भारतीय जनता पक्षाने २०१४ साली मराठा समाजाला १६ टक्के देतो असे आश्वासन दिले होते. सत्ता आल्यानंतर आरक्षण देणार असे छातीठोकपणे सांगत होते. २०१४ नंतर राज्यात व केंद्रातही भाजपचे सरकार आले असताना आरक्षणासाठी मराठा समाजाला मोर्चे का काढावे लागत आहेत?नाना पटोले म्हणाले की, मराठा समाजाला जर आज आरक्षणासाठी मोर्चे काढावे लागत असतील तर त्याचे पाप भाजपचेच आहे. सरकार अकार्यक्षम आहे कोणत्याही समाजघटकांना न्याय देऊ शकत नाही म्हणून विविध समाजघटक मोर्चे काढून न्यायाची मागणी करत आहेत.

# फडणवीस मुख्यमंत्री होऊ नये म्हणून पवारांनी सर्वतोपरी प्रयत्न केले–बावनकुळे

**मुंबई । प्रतिनिधी**

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होऊ नयेत म्हणून शरद पवारांनी खूणगाठ बांधली होती, त्यासाठी जे जे प्रयत्न करायचे होते ते शरद पवार करत आहेत. देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम शरद पवारांनी केले, हे अजित पवार, छगन भुजबळ आणि देवेंद्र फडणवीसांनी देखील सांगितलेले आहे, असे वक्तव्य भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.दरम्यान चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, आता शरद पवार यांनी कितीही प्रयत्न केले तरी देवेंद्र फडणवीस यांचा विजयरथ काहीही केले तरी थांबणार नाही, असा हल्लाबोल चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. त्यांनी आज शिरूर लोकसभेत 'घर चलो अभियान' अंतर्गत बैठक घेतली. त्याबैठकीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, आता मुख्यमंत्री कोण असणार? यावर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, भाजपच्या कार्यकर्त्यांना वाटते देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री व्हावे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना अजित पवार मुख्यमंत्री होतील, असे वाटते. तसेच शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना पुन्हा मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदेच विराजमान होतील, असे वाटते. तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या या भावना आहेत. त्यात काहीच गैर नाही. प्रत्येक नेत आणि कार्यकर्ता आपला पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न करतो. मात्र पुढील निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपदाचा निर्णय पार्लमेंट्री बोर्ड घेईल. बोर्ड ठरवेल तोच मुख्यमंत्री होईल.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलीन यांचा मुलगा उदयनिधी स्टॅलिनने हिंदू संस्कृती गाडून टाकण्याची घोषणा केली आहे. अशा पक्षाशी असलेली युती तोडणार का? असा माझा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांना प्रश्न आहे, त्यांनी उत्तर द्यावे, अशी अपेक्षा भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली.

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी घेतली जनजाती सल्लागार परिषेदची बैठक

# महाराष्ट्रासाठी स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करणार : मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यास मान्यता दिल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य जनजाती सल्लागार परिषदेमध्ये याप्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. यासोबतच राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेबाबत, लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची तरतूद, आदिवासी जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये प्रकल्प कार्यालय सुरू करणे आदी विविध विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली.



मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्यासह आदिवासी क्षेत्रातील खासदार, आमदार उपस्थित होते.राज्यासाठी स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून या आयोगाच्या अधिनियमाचा मसूदा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून तयार करून घेण्यात आला आहे. आज झालेल्या राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५१ व्या बैठकीत त्यास पुढील कार्यवाहीसाठी मान्यता देण्यात आली. आदिवासी विभागासाठी तरतूद करण्यात आलेला निधी त्या आर्थिक वर्षात खर्च झाला नाही तर तो व्यपगत होतो याविषयावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. विभागासाठी डिसेंबर अखेरपर्यंत संपूर्ण निधी वितरीत करायचा. अन्यत्र निधी वळवायचा नाही असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. आदिवासी क्षेत्रात होणाऱ्या कामांची गुणवत्ता दर्जेदार असली पाहिजे, रस्ते, आश्रमशाळा, वसतीगृह यांची कामे दर्जेदार होण्यासाठी यंत्रणेने प्रयत्न करावेत त्यासाठी त्याभागातील खासदार, आमदार यांनी संनियंत्रण करावे, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.राज्यातील ११ अतिसंवेदनशील प्रकल्प कार्यालयांमध्ये प्रकल्प अधिकारी पदावर भारतीय प्रशासना सेवेतील अधिकाऱ्यांची पूर्णवेळ नियुक्ती करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. प्रकल्प अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांना नियमित भेटी द्याव्यात, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. यावेळी आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये तालुकास्तरावर प्रकल्प कार्यालयांची निर्मिती करण्यासाठी मान्यता देण्यात आली. राज्यातील आदिवासी तालुक्यांना आकांक्षित तालुके घोषित करण्याबाबत यावेळी निर्णय घेण्यात आला. राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेच्या प्रस्तावाबाबत यावेळी चर्चा झाली. राज्यात सध्या १३ जिल्हे अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित असून त्यातील २३ तालुके पूर्णत: ३६ अंशता तालुके आहेत. अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेच्या प्रस्तावात नव्याने गावांचा समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केल्याचे यावेळी सांगण्यात आले. पुनर्रचनेच्या प्रस्तावानुसार नव्याने गावे वाढणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्यावर सर्व लोकप्रतिनिधींशी विचारविनिमय करून आदिवासी विकास मंत्री यांनी अंतिम आराखडा तयार करण्याबाबत बैठकीत निर्णय घेण्यात आला.यावेळी आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी सादरीकरण केले. आयुक्त राजेंद्र भारूड यांनी पुनर्रचनेबाबत सादरीकरण केले. बैठकीस खासदार राजेंद्र गावित, अशोक नेते, आमदार सर्वश्री राजकुमार पटेल, दौलत दरोडा, अशोक उईके, किरण लहामटे, आमशा पाडवी, राजेश पाडवी, शिरीषकुमार नाईक, दिलीप बोरसे, काशिराम पावरा, नितिन पवार, कृष्णा गजबे, शांताराम मोरे, हिरामन खोसकर, संदीप दुर्वे, सुनिल भुसारा, श्रीनिवास वनगा, राजेश पाटील, देवराम होळी यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

# कवितेतून व्यापक समाजजाणिवा व्यक्त व्हाव्या–डॉ.रवींद्र शोभणे

**वरोरा । प्रतिनिधी**

समाजातील अस्वस्थ वास्तवाकडे पाहण्याची इतरांपेक्षा वेगळ्या प्रकारची गंभीर मूल्यदृष्टी कवीला प्राप्त झालेली असते. त्याच्याकडे समाजाचे निरीक्षण आणि परीक्षण करण्याचे भाष्यज्ञान असते. कवीने या प्रतिभा ज्ञानातून व्यापक अशा समाजजाणिवांसह कवितेतून व्यक्त व्हावे असे उदगार अंमळनेर येथे होणाऱ्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध साहित्यिक डॉ. रवींद्र शोभणे यांनी काढले. कवितेचे घर, शेगांव ( बुद्रुक ), त. वरोरा, जि चंद्रपूर येथे पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी कवितेसाठी वाहिलेल्या अभिनव अशा कवितेच्या घराचे बापुराव पेटकर काव्य पुरस्कार त्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघांचे अध्यक्ष प्रदीप दाते हे होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर विभागाचे शिक्षण उपसंचालक उल्हास नरड, सुप्रसिद्ध कवी व मराठी भाषा विभागप्रमुख स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील डॉ. पी. विठ्ठल, वर्ध्याचे प्रसिद्ध गझलकार विद्यानंद हाडके, कवितेच्या घराचे संस्थापक श्रीकांत पेटकर मंचावर उपस्थित होते. या सोहळ्यात बापुरावजी पेटकर काव्यपुरस्कारप्राप्त मान्यवर कवी डॉ. अशोक इंगळे, अे. के. शेख, एकनाथ आव्हाड, रजनी राठी, शृंखल खेमराज यांना पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच बापुरावजी पेटकर काव्य सन्मानाचे मानकरी डॉ. अरविंद पाटील, प्रशांत खैरे, नोमेश नारायण, डॉ. वसुधा वैद्य, मंजुषा दरवरे, सुजित कदम यांना सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रदीप दाते म्हणाले, शेगांव सारख्या ग्रामीण भागात कवितेचे घर उभे राहणे ही अद्वितीय कल्पना आहे. ही अद्वितीय कल्पना भविष्यकाळात अधिक वृद्धिंगत व्हावी अशी अपेक्षा



त्यांनी व्यक्त केली. डॉ. पी. विठ्ठल कवींना मार्गदर्शन करताना म्हणाले, कवींनी संकुचित वृत्तीने लेखन करू नये, त्यांनी मोठया जीवनपटाचा भाग व्हावे. त्याच्या कवितेतून वैश्विकतेचे दर्शन व्हावे. याप्रसंगी शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांनी पुरस्कार सोहळ्याचे कौतुक केले व कवींना पुढील लेखनासाठी सदिच्छा दिल्या. विद्यानंद हाडके यांनी गझल सादर करून जीवनाचे मर्म सांगितले. डॉ. अशोक इंगळे यांनी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सर्व कवींच्या वतीने कवितेच्या घराचे आभार मानले. कार्यक्रमापूर्वी सकाळी गावातून शाळेतील विद्यार्थ्यांची काव्यदिंडी काढण्यात आली. या काव्यदिंडीत जि. प. प्राथमिक शाळा, शेगांवनेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, शेगांव, नॅशनल इंग्लिश स्कूल, शेगांव या शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले. काव्यदिंडीत साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी एकनाथ आव्हाड, प्रसिद्ध अभिनेते सुधीर चित्ते, साहित्यिक रमेश धनावडे, वैभव धनावडे व साहित्यसंपदा समुहाच्या सदस्यांचा समावेश होता. प्रास्ताविकातून कवितेच्या घराचे संस्थापक श्रीकांत पेटकर यांनी कार्यक्रमामागील भूमिका विषद केली. संचालन कार्यवाह प्रमोद नारायणे यांनी केले तर आभार संकल्पनाकार किशोर पेटकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप भेले प्रसिद्धी प्रमुख सूर्यकांत पाटील, विकास जवादे, अमोल दातारकर, डॉ. दीपक लोणकर, प्रा. भालचंद्र लोडे, नितीन वैद्य, भारत रामटेके, रजनी रामटेके, धर्मराज लोडे, आशिष धकाते यांनी मोलाचे सहकार्य केले.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील आवश्यक सुविधांचा घेतला आढावा

### सकारात्मक प्रस्ताव द्या, खा.अशोक नेते यांची सूचना



**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोलीत होऊ घातलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मेडिकल कॉंसिल ऑफ इंडियाकडून मान्यता मिळून हे महाविद्यालय लवकरात लवकर सुरू करण्यासंदर्भात सुविधांचा आढावा घेण्यात आला. यावेळी खासदार अशोक नेते यांनी रुग्णालयातील आवश्यक सुविधांची पाहणी करत आणखी कशाची गरज आहे याची माहिती अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली.मेडिकल कॉलेजसाठी स्वतंत्र इमारतीची गरज असून त्याची उभारणी करण्यासंदर्भात यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रमोद खंडाते, मेडीकल कॉलेजचे नवनियुक्त अधिष्ठाता डॉ.अविनाश टेकाडे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सतीशकुमार सोळंके, डॉ.समीर गोलावार, डॉ.अशोक गजभिये, डॉ.इंद्रजित नागदेवते हे प्रामुख्याने उपस्थित होते.जिल्हावासियांना जास्तीत जास्त चांगली आणि तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा मिळावी, त्यांना चंद्रपूर किंवा नागपूरला जाण्याची गरज पडू नये यासाठी गडचिरोलीचे वैद्यकीय महाविद्यालय लवकर सुरू करण्यासंदर्भात सकारात्मक प्रस्ताव शासनाकडे सादर करा, अशी सूचना यावेळी खासदार नेते यांनी अधिष्ठाता डॉ.टेकाडे यांना केल्या. यावेळी त्यांनी रुग्णालयातील विविध विभागांनाही भेटी दिल्या.

## दहेगांवात संत डोमाजी महाराज पुण्यतिथी संपन्न



**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील दहेगांव येथे मागील ३४ वर्षापासून पुण्यतिथी मोठया साजरी केल्या जात आहे. पुण्यतिथी निमित्त दोन दिवस भजन किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पुण्यतिथी कार्यक्रम विशाल पारखी ,ग्रा.पं. सरपंच दहेगांव यांच्या नेतृत्वात करण्यात आला

संत डोमाजी महाराज देवस्थाचे अध्यक्ष निळकंट सूर यांनी ग्रामगीता व भगवी टोपी देवून सत्कार रामाजी क्षीरसागर यांचा सत्कार केला. या कार्यक्रमास ग्रामस्थ व तंटामुक्ती अध्यक्ष पोलीस पाटील उपस्थित होते. वरोरा तालुक्यातील दहेगांव हे आदर्श गाव आहे. कोरोना काळात डॉ.आगलावे यांनी विशाल पारखी यांच्या नेतृत्वात गरजवंतांना धान्याचे किट्स वाटप केले. तसेच वरोरा तालुक्यातील अनेक देवस्थानांना जगन्नाबाबा संत तुकडोजी महाराज, हनुमान मुर्त्या डॉ.आगलावे यांनी भेट दिले यावेळी संत डोमाजी महाराज देवस्थानच्या वतीने डॉ.आगलावे यांचा सत्कार करण्यात आला. .

## कर्मचारी संघटनेच्या उपाध्यक्षपदी प्रमोद नागापुरे यांची निवड



**वरोरा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर महासंघ संलग्नित चंद्रपूर गडचिरोली गडचिरोली शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांच्या अधिनस्त राहून आनंद निकेतन महाविद्यालयामध्ये तीन वर्षाकरिता शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समस्या सोडविण्याकरिता कर्मचारी संघटना स्थापन करण्यात आली. सर्व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांच्या अनुमतीने प्रमोद नागापुरे यांची आनंद निकेतन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या कार्यकारणीमध्ये अध्यक्ष सचिन नाखले तर सचिव म्हणून पद्माकर सोयाम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सर्वस्वी सदस्य म्हणून सीमा काळमेंघे कोषाध्यक्ष, सहसचिव हेमंत कुमार पुसाम,महिला प्रतिनिधी मनीषा मनगटे यांची निवड झाली तर सदस्य बंडू सपाट, अरुण जुनघरे, अविनाश भोपकर, कार्यकारणी मध्ये ज्येष्ठ सल्लागार कालिंदी देशमाने, बाबा वटे, योगेश मुक्तेवार यांची निवड करण्यात आली. या निवडी बद्दल प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले आहे.

## ना.मुनगंटीवार सेवा केंद्र घुग्घुसतर्फे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यतिथी

**वरोरा । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यतिथी ना. सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्र घुग्घुस येथे माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात व भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांच्या नेतृत्वात संपन्न झाली.याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून विनम्र अभिवादन केले तसेच आपले विचार व्यक्त केले.यावेळी भाजपाचे साजन गोहणे, अमोल तुलसे, जनाबाई निमकर, संध्या जगताप, माया मांडवकर, वर्षा बोबडे, अर्चना बेहरे, सुनंदा लिहीतकर, स्वप्नील कारले, राज नान्हे, नेहा कुम्मरवार, पायल वाडगुरे, शीतल कामतवार, खुशबू मेश्राम व नागरिक उपस्थित होते.



# प्रत्येक धर्मातील भजन मानवतेचाच संदेश देतात–भागवताचार्य मनीष महाराज

## लोकसेवक डॉ.सच्चिदानंद मुनगंटीवार यांच्या जयंतीनिमित्त भजन संमेलन





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जगातील प्रत्येक धर्म मानवतेचा गुरुमंत्र देणारा आहे.ज्याला आपला धर्म कळतो तो दुसऱ्या धर्माचा आदर करतो.राष्ट्रसंतांनी देखील भजनातून असाच संदेश दिला.त्यांच्या भजनातून देशात क्रांती झाली.आजही देशाला भजनाची गरज आहे.सर्वांचे जीवन धावपळीचे झाले आहे.अशात मन शांत करण्यासाठी व जीवनाचा आनंद लुटण्यासाठी भजन ऐकले पाहिजे,गायिले पाहिजे त्यात तल्लीन झाले पाहिजे असे मौलिक प्रबोधन भागवताचार्य मनीष महाराज यांनी भजन संमेलनात केले. ते अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरूकुंज आश्रम संचलित श्री गुरुदेव सेवा मंडळ शहर शाखा चंद्रपूर चे वतीने,लोकसेवक डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार यांचे जयंती निमीत्य आयोजित भव्य भजन संमेलन कार्यक्रमात सोमवार ९ ऑक्टोबर ला महेश भवन तुकुम येथे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.यावेळी उदघाटक म्हणून आ.किशोर जोरगेवार यांची तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विजय आईंचवार(माजी कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ) वसंतराव थोटे (अध्यक्ष, डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी सेवा समिती), दामोधर पाटील (उपसर्वाधिकारी गु. आश्रम, मोझरी) ,प्रकाश महाराज वाघ. विठ्ठलराव सावरकर,डॉ.दत्ता हजारे जिल्हा सेवाधिकारी ,अशोकराव चरडे जिल्हा सेवाधिकारी, रुपलाल कावळे प्रसिद्धी प्रमुख, श्राम राऊत, डॉक्टर अंकुश आगलावे, प्रेमलाल पारधी, मिलिंद कोतपल्लीवार, किरण पाल, , सुधाकर टिकले, वासुदेवराव सादमवार , बबनराव धर्मपुरीवार , प्रकाशराव गुंडावार, जयंतराव बोनगरवार ,सुमेध कोतपल्लिवार ,विलास येगिणवार ,अमित कासनगोट्टूवार, डॉक्टर दाभेरे , यांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना आ.किशोर जोरगेवार म्हणाले,डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार यांनी केलेली सेवा समाज कधीही विसरणार नाही. डॉक्टरी पेशात असणाऱ्या डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार यांनी ख–या अर्थाने रुग्णसेवा केली.म्हणूनच आज लोकसेवक असे संबोधण्यात येत आहे आज त्यांच्या जयंती निमित्त आपण आयोजित केलेले भजन संमेलन त्यांना आपण वाहिलेली सर्वोत्तम आदरांजली आहेच सोबतच संस्कृतीचा समृद्ध मार्ग जोपासण्यासाठी भजन मंडळांना सक्षम करण्याचा संकल्प त्यांच्या जयंती दिनी आज आपण करुया, असे ते म्हणाले. गोंडवाना विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉक्टर विजयराव आईंचवार यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जीवनावर मार्गदर्शन केले मार्गदर्शन केले व संमेलनाचे कौतुक केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना भजन संमेलनाचे मुख्यसंयोजक इंजि सुभाष कासनगोट्टूवार म्हणाले,प्रभागात सहा गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना , निर्माण नगर येथे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रवेशद्वार बांधकाम नगरसेवक निधी मधून केले, महानगरपालिकेतर्फे महानगरपालिकेतर्फे घेण्यात आलेल्या आलेल्या स्वच्छता स्पर्धेमध्ये गुरुदेव सेवा मंडळ तुकूमने तृतीय क्रमांक पटकाविला यात ५१ हजार रुपये रोख आणि दहा लाख रुपये विकास कार्य पुरस्कार मिळाला, तसेच तसेच ओपन स्पेस सौंदर्यकरनामध्ये माझ्या प्रभागातील १२ मंडळांनी सहभाग घेतला व पाच मंडळांना पुरस्कार मिळाला यात गुरुदेव सेवा मंडळ द्वारका नगरीला ७१ हजार रुपये रोख आणि ७ लाख रुपये विकास कार्याचा पुरस्कार मिळाला , २६जानेवारी २०२३ ला राज्यस्तरीय खंजिरी भजन स्पर्धा घेण्यात आली, सहा जून लोकसेवक डॉक्टर सच्चिदानंद मुनगंटीवार यांचा स्मरण दिवस गुरुदेव सेवा मंडळ तूकुंम तर्फे १२००नागरिकांना चष्मे वाटप व १०६नागरिकांचे मोतीबिंदू ऑपरेशन मोफत करण्यात आले , आणि आज लोकसेवक डॉक्टर सच्चिदानंद मुनगंटीवार यांच्या जयंती निमित्त १३६ भजन मंडळ उपस्थित झाले आणि इतिहास झाला आणि भजन संमेलन सकाळी ९ ते रात्री ११ पर्यंत चालले.हे सर्व ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनामुळे शक्य झाले,अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी कासनगोट्टूवार यांनी ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या शुभ – संदेशपत्राचे वाचन केले. या भजन मंडळातील प्रथम पाच मंडळांना क्लब राऊंड येथे होणाऱ्या मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमात ना . सुधीर मुनगंटीवार यांचे उपस्थिती मध्ये सिने कलावंतांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात येणार असल्याची विशेष माहिती दादाजी नंदनवार यांनी दिली.कार्यक्रमाचे संचालन पुरुषोत्तम राऊत यांनी केले.अण्णाजी धवस यांनी आभार मानले.आयोजन समितीचे ग्रामगीताचाऱ्य दादाजी नंदनवार, तालुका प्रमुख धनराज चौधरी, ग्रामगीताचार्य अण्णाजी ढवस,वसंतराव धंदरे, जेष्ठ उपासक पुरुषोत्तम राऊत,विठ्ठलराव डुकरे,गजानन भोयर,बबनराव अनमुलवार, आनंदराव मांदाडे, वृषाली धर्मपूरीवार, मंजुश्री कासंगोट्टूवार,प्रज्ञा गंधेवार,कल्पना गिरडकर,आशीष ताजने ,रामराव धारणे,बंडू वाढई ,माया मंदाडे, भोलारम सोनुले ,आशिष बोंडे,सचिन हरणे,उषामेश्राम ,यांनी परिश्रम घेतले.

### ..आणि ते म्हणाले गुरुदेव भक्त असा असावा.

राष्ट्रसंतांनी मानवतेचा संदेश देत समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी जीवन अर्पित केले.परिसरच नाही तर मनाची स्वच्छता त्यांनी केली आणि देशात क्रांती झाली.आज त्यांचे लाखो अनुयायी आहेत.पण त्या अनुयायीन्ना भजन संमेलन माध्यमातून एका मंचावर आणण्याची कला सर्वात नाही.हे शुभकार्य गुरुदेव भक्त इंजि.सुभाष कासंगोट्टूवार यांनी केलं आहे.त्यांच्या कार्याचा आलेख बघितला तर गुरुदेव भक्त असा असावा म्हंटले तर वावगे ठरू नये,अश्या शब्दात कासंगोट्टूवार यांचे कौतुक गुरुकुंज आश्रम मोझरीचे उप सर्वाधिकारी दामोदर पाटील दादा यांनी केले.गुरुदेव भक्तांनी टाळ्या वाजवून त्याला दाद दिली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .